सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

अ

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १६ /०२/२०२३

**परिपत्रक** -

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन,गृह विभाग, निर्णय क्र.पीएडब्लू -१११७/प्र.क्र.७१९(भाग-२)/विशा-६, दिनांक १४.०२.२०२३.

**विषय** :- मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना (निर्भया) या योजनेच्या अंमलबजावणी करिता रु.११५.३७ कोटी इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मंजूरी देण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.पीएडब्लू -१११७/प्र.क्र.७१९(भाग-२)/विशा-६, दि.१४.०२.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०२१४१५४१४९०७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( विनय राणे )
वरिष्ठ कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह),
अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,बृहन्मुंबई.



Scanned with CamScanner

मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना (निर्भया) या योजनेच्या अंमलबजावणी करिता रु. ११५.३७ कोटी इतका निधी वितरित व खर्च करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएडब्ल्यू-१११७/प्र.क्र.७१९ (भाग-२)/विशा-६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १४ फेब्रुवारी, २०२३.

वाचा:- १) गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीएडब्ल्यू-१११७/प्र.क्र.७१९ (भाग-४)/विशा-६, दिनांक १४.०५.२०२१.
२) मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेच्या (निर्भया) अंमलबजावणी करिता गठीत उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीची (High Power Committee) दिनांक ०३.११.२०२२ रोजी १० वी बैठक.

**प्रस्तावना:-**

मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना या केंद्र आणि राज्य शासन पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीस दिनांक ३१.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेस केंद्र शासनाने रु. २५२ कोटी इतक्या निधीस मान्यता दिलेली असून या योजनेच्या निधीमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६०:४० असा आहे.

मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेच्या (निर्भया) अंमलबजावणी करिता गठीत उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीची (High Power Committee) दिनांक ०३.११.२०२२ रोजी १० वी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेच्या अंमलबजावणीकरिता रु. ११५.३७ कोटी एवढा निधी बीम्स प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना - निर्भया योजने अंतर्गत यंत्रसामग्री / साधनसामग्री खरेदीसाठी रु. ११५.३७ कोटी (रुपये एकशे पंधरा कोटी सदोतीस लक्ष) इतका निधी वितरित व खर्च करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

| Track | Component | एकूण निधी | केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्य हिस्सा (४० टक्के) |
|---|---|---|---|---|
| | Public Address System | ३.४२ | २.०५२ | १.३६८ |
| | Cyber Forensic Tools | १९.३५ | ११.६१ | ७.७४ |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Technology | Mobile Data Terminals | ८.११ | ४.८६६ | ३.२४४ |
| | Forensic and Fingerprint Investigation Tools | २.८६ | १.७१६ | १.१४४ |
| | Digital Evidence Collection System | १०.४४ | ६.२६४ | ४.१७६ |
| | Forensic Evidence Collection System (ibike) | १.०७ | ०.६४२ | ०.४२८ |
| | Emergency Response Vehicle System | २.१३ | १.२७८ | ०.८५२ |
| | Forensic Evidence Collection System (ibike) - Additional | ३.८१ | २.२८६ | १.५२४ |
| | Mobile Data Terminals and Closed User Group Devices | ११.२७ | ६.७६२ | ४.५०८ |
| | Nirbhaya (Discrete) Patrolling Squad | ११.८५ | ७.११ | ४.७४ |
| | Social Media Analytics Lab & Crime Analytics Cell | ३.११ | १.८६६ | १.२४४ |
| | Mumbai Police Application | ३.६६ | २.१९६ | १.४६४ |
| Capacity Building | IT Equipment | १.७६ | १.०५६ | ०.७०४ |
| | Nirbhaya Sahayata Kaksha Cell | ६.५१ | ३.९०६ | २.६०४ |
| | Photography and Video Equipment | ०.९४ | ०.५६४ | ०.३७६ |
| | Mobile Forensic Units | ३.५४ | २.१२४ | १.४१६ |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Awareness | Digital Billboard | २.४५ | १.४७ | ०.९८ |
| | Awareness | १.४६ | ०.८७६ | ०.५८४ |
| Outreach | Social Survey | १.०४ | ०.६२४ | ०.४१६ |
| | Nirbhaya Feedback Call Center | १.१३ | ०.६७८ | ०.४५२ |
| | Nirbhaya Mobile Victim Support Unit | २.५२ | १.५१२ | १.००८ |
| | Nirbhaya Counselling Centre | ३.०३ | १.८१८ | १.२१२ |
| | Nirbhaya Centre for Assistance and Counselling for Women (CAW) | ४.०० | २.४० | १.६० |
| | Integrsated Grievances Redressal Management System (IGRMS) | ४.१३ | २.४७८ | १.६५२ |
| Miscellaneous | Project Management Consultancy | १.७८ | १.०६८ | ०.७१२ |
| Total | | ११५.३७ | ६९.२२२ | ४६.१४८ |

२. सदर प्रयोजनासाठी या लेखाशीर्षातर्गत प्राप्त होणारा निधी खर्च करण्यासाठी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गुन्हे कोष, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना - निर्भया योजनेच्या अंमलबजावणी बाबत गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच, यंत्रसामग्री / साधनसामग्री खरेदी करण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

४. केंद्र शासनाच्या गृह विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला निधीचा विनियोग / खर्च हा केंद्र / राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार विहीत पध्दतीने येणा-या किमतीनुसार व लेखाशिर्षनिहाय विहीत करण्यात आलेल्या एकूण वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून व यासंदर्भातील वित्तीय औपचारीकता पूर्ण करून करण्यात यावी.



Scanned with CamScanner

५. कोणत्याही परिस्थितीत प्राप्त निधी संचित (parking) स्वरूपात ठेऊ नये. यानुषंगाने प्राप्त निधीचा विनियोग झाल्यानंतर विहीत कालावधीत योग्य त्या विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र (utilization certificate) सादर करावे. प्रस्तुत योजनेचे प्राधिकारी म्हणून केंद्रशासनाच्या आवश्यकतेनुसार अंतर्गत लेखापरीक्षणासाठी यासंदर्भातील लेखे अद्ययावत ठेवण्यात यावे.

६. सदर खर्च हा, गृह विभाग, मागणी क्र. बी-१०, ४०५५-पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७ राज्य पोलीस (दत्तमत), (००) (१३) ४०५५०२८८ निर्भया निधी अंतर्गत केंद्र हिस्सा (६०%) अंतर्गत आणि मागणी क्र. बी-१०, ४०५५-पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७ राज्य पोलीस (दत्तमत), (००) (१४) ४०५५०२९७ राज्य हिस्सा (४०%) लेखाशीर्षाखाली सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदींतून करण्यात यावा.

७. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०४.०४.२०२२ आणि दिनांक ०८.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निदेशांस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक 202302141541490729. असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(राहुल वि. कुलकर्णी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
५. प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
७. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. व्यय-७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अर्थसंकल्प शाखा (बीयूडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (विशा-६).



Scanned with CamScanner